श्री. दादापाटील राजळे शिक्षण संस्थेचे

# दादापाटील राजळे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय

आदिनाथनगर, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर



## राष्ट्रीय सेवा योजना

NATIONAL SERVICE SCHEME




## अहवाल
## विशेष शिबीर
## २०२२-२०२३


















## स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव
## व
## युवकांचा ध्यास, ग्राम शहर विकास



## मढी
## दि. ११ ते १७ जानेवारी २०२३

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

# दादापाटील राजळे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

## आदिनाथनगर, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर

### राष्ट्रीय सेवा योजना

### विशेष शिबीर

### अहवाल : २०२२-२३

---

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे व दादापाटील राजळे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आदिनाथनगर पाथर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व युवकांचा ध्यास, ग्राम शहर विकास उपक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर बुधवार, दिनांक ११ जानेवारी २०२३ ते मंगळवार, १७ जानेवारी २०२३ या कालावधीमध्ये मढी, तालुका पाथर्डी जिल्हा अहमदनगर या ठिकाणी आयोजित करण्यात आले. सोमवार दिनांक १० रोजी शिबीर स्थळी प्रयाण करण्यात आले त्या ठिकाणी शिबीराला लागणारे सर्व साहित्य पोहोच करण्यात आले. दिनांक ११ जानेवारी रोजी ग्रामस्वच्छता करण्यात आली त्याचप्रमाणे पुढील दिवसांचे कामाचे कालबद्ध नियोजन केले. विद्यार्थ्यांचे विविध ग्रुप करून पुढील दिवसातील सर्व कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. दुपारच्या सत्रात डॉ. जी. बी. लवांडे यांचे जैव विविधता या विषयावर बौध्दिक सत्रात व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री कानिफनाथ देवस्थानचे व्यवस्थापक मा. श्री. संजय मरकड हे होते.

दि. १२ जानेवारी रोजी श्री. दादापाटील राजळे शिक्षण संस्थेचे विश्वस्त मा श्री. राहुलदादा राजळे यांच्या हस्ते व इतिहास तज्ञ मा डॉ. किसनराव अंबाडे, अध्यक्ष, इतिहास विषय अभ्यास मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे व इतिहास विभाग प्रमुख न्यू आर्ट्स, कॉमर्स व सायन्स कॉलेज अहमदनगर यांच्या प्रमुख उपस्थीत विशेष शिबिरचा उदघाटन समारंभ पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कानिफनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष श्री. बबनराव मरकड हे होते. याप्रसंगी राजमाता जिजाबाई यांची जयंती, स्वामी विवेकानंद यांची जयंती, स्व. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांची जयंती, व स्व. अण्णासाहेब शिंदे यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. डॉ. किसनराव अंबाडे यांनी राष्ट्रीय सेवा योजना शिबिर हे विद्यार्थ्यांच्या सामाजिक विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असते. विद्यार्थ्यांचा सामाजिक विश्वास हा विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवतो आणि हा वाढलेला आत्मविश्वास देशाला सामर्थ्यवान बनवतो असे प्रतिपादन केले. मा. श्री राहुलदादा राजळे यांनी मनोगत व्यक्त करताना राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होतो व

श्रमदानातून सामाजिक भावना निर्माण होते असे मत व्यक्त केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष बबनराव मरकड, यांनी या शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी कानिफनाथ देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त मा. डॉ. विलास मढीकर, मा. श्री. नवनाथ मरकड, भाऊसाहेब मरकड, मढी ग्रामपंचायतचे उपसरपंच मा. श्री. रविंद्र आरोळे, श्री. दादापाटील राजळे शिक्षण संस्थेचे विश्वस्त, मा. श्री. सुभाषराव ताठे, मा. श्री. शेषराव ढाकणे, मा. श्री. काशिनाथ बर्डे, मा. श्री. बाळासाहेब गोल्हार व ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजधर टेमकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वयंसेविका कदम वैष्णवी हिने केले.

दि. १३ जानेवारी रोजी श्री कानिफनाथ देवस्थान गडावरील स्वच्छता केली. तेथे अतिरिक्त पउलेल्या बांधकामाचे साहित्य खाली टाकले. झाडांना आळे करण्यात आले. दुपारच्या सत्रात प्रा. राजू सुरवसे, हास्यसम्राट यांचे आनंदी जीवनाचा मार्ग या विषयावर बौध्दिक सत्रात व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री कानिफनाथ देवस्थानचे कोषाध्यक्ष मा. श्री. भाऊसाहेब मरकड हे होते.

दि. १४ जानेवारी रोजी श्री कानिफनाथ देवस्थान गडावरील स्वच्छता केली. तेथे अतिरिक्त पउलेल्या बांधकामाचे साहित्य खाली टाकले. देवराईतील झाडांना आळे करण्यात आले. तसेच या भागातील स्वच्छता करण्यात आली. दुपारच्या सत्रात प्रा. अमोल आगासे, कवी यांचे विद्यार्थ्यांचे आयुष्य या विषयावर बौध्दिक सत्रात व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री कानिफनाथ देवस्थानचे विश्वस्त मा. श्री. नवनाथ मरकड हे होते.

दि. १५ जानेवारी रोजी गावातील सर्व रस्त्यांची स्वच्छता करण्यात आली. देवेद्रनाथ मंदीर परिसरात चर खोदण्यात आले. दुपारच्या सत्रात मा. श्री. गणेश चोथे, कृषीउद्योजक यांचे आधुनिक शेती व दुग्धव्यवसाय व्यवस्थापन या विषयावर बौध्दिक सत्रात व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री कानिफनाथ देवस्थानचे विश्वस्त मा. श्री. शामराव मरकड हे होते. यावेळी विद्यार्थ्यांनी शेती व दुग्धव्यवसाया संबंधी अनेक प्रश्न विचारले.

दि. १६ जानेवारी रोजी स्मशानभुमीची स्वच्छता करण्यात आली. मढी ते मायंबा रस्त्यावर लावण्यात आलेल्या ६०० झाडांना आळे करण्यात आले. दुपारच्या सत्रात डॉ. श्रीधर देशमुख, विश्वस्त, मोहटादेवी संस्थान यांचे ग्रामीण विकासात तरुणांची भूमिका या विषयावर बौध्दिक सत्रात व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. श्री. शामराव मरकड, माजी सरपंच, मढी हे होते.

दि. १७ जानेवारी रोजी मा. प्राचार्य डॉ. एम. एल. डोंगरे, जामखेड महाविद्यालय, जामखेड यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबीराचा समारोप समारंभ पार पडला. या समारोपाच्या कर्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून मा. श्री रामकिसन काकडे, उपाध्यक्ष, वृ. सह. सा. का. लि. आदिनाथनगर हे होते.

समारोप कार्यक्रम प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. एम. एल. डोंगरे यांनी राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात विद्यार्थ्यांवर सामाजिक संस्कार घडतात हे संस्कार आयुष्य घडविण्यासाठी खूप मोलाचे असतात. यातूनच देशाचे भावी नागरिक घडतात त्यासाठी आजच्या विद्यार्थ्यांनी व्यसनापसून दूर रहावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष, रामकिसन काकडे, उपाध्यक्ष, वृ. सह. सा. का. लि. आदिनाथनगर यांनी राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातील विद्यार्थ्यांनी केलेल्या श्रमदानाचे कौतुक केले व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी मा. प्रा. अविनाश फलके, कार्यक्रम अधिकारी, जामखेड महाविद्यालय, जामखेड, मा. श्री. श्रीकांत मिसाळ, संचालक वृ. सह. सा. का. लि. आदिनाथनगर, मा. श्री नवनाथ मरकड, सचिव, कानिफनाथ देवस्थान ट्रस्ट मढी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजधर टेमकर यांनी शिबिराच्या समारोप कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कु. श्रध्दा कचरे या विद्यार्थिनीने अहवाल वाचन केले. फुलशेटे प्रतिक, खोजे महेश, कु. गरूड तनुजा या स्वयंसेवकांनी शिबिरातील अनुभव व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी मा. श्री. शंकरराव पाखरे, उपाध्यक्ष, वि. का. सो. मढी, मा. श्री बाबासाहेब किलबिले, नारायण काकडे, संचालक, वृ. सह. सा. का. लि. आदिनाथनगर, मा. सौ. शिदोरे मॅडम, तसेच कानिफनाथ देवस्थान ट्रस्टचे सर्व विश्वस्त, मढी ग्रामपंचायत चे सरपंच, सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. त्याचबरोबर दादापाटील राजळे महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. एम. एस तांबोळी, डॉ. जे. एन. नेहूल, डॉ. एस. जे. देशमुख, डॉ. आर. टी. घोलप, डॉ. एस. बी. देशमुख, डॉ. एस. आर. भराटे, डॉ. जी. बी. लवांडे, डॉ. डी. एन. कांडेकर, डॉ. के. जी. गायकवाड, डॉ. अतुलकुमार चौरपगार, प्रा. सी. एन. पानसरे, तसेच सर्व प्राध्यापक व सेवक वृंद उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी प्रा. आसाराम देसाई यांनी केले. सूत्रसंचालन भवार श्वेता व पठाण अयेशा या विद्यार्थिनींनी केले.

दि. १७ जानेवारी रोजी सकाळी मतदार जागृती व बालविवाह बंदी या विषयी जनजागृती करण्यासाठी प्रभात फेरी काढण्यात आली. या शिबीरात रोज सकाळी योगा, प्रार्थना, एनएनएस गीत, विद्यापीठ गीत याचे आयोजन केले गेले. तसेच रात्री समाजप्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शिबीरात १२० स्वयंसेवक सहभागी झाले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. आसाराम देसाई, डॉ. साधना म्हस्के, प्रा. अस्लम शेख, प्रा. योगिता इंगळे, डॉ. नितीन भिसे आणि श्री शिवाजी बर्डे यांनी विशेष श्रम घेतले.

# ‘राष्ट्राच्या सक्षमीकरणात युवकांची महत्त्वाची भूमिका’



**पाथर्डी :** राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होतो. श्रमदानातून सामाजिक भावना निर्माण होते. विद्यार्थ्यांचा सामाजिक विश्वास हा विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवतो आणि हा वाढलेला आत्मविश्वास देशाला सामर्थ्यवान बनवतो, असे प्रतिपादन दादापाटील राजळे विद्यालयाचे विश्वस्त राहुल राजळे यांनी केले.

श्री दादापाटील राजळे शिक्षण संस्थेचे, दादापाटील राजळे कला विज्ञाण व वाणिज्य महाविद्यालय, अदिनाथनगर राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचा मढी येथे उदघाटन समारंभ पार पडला. या वेळी राजळे बोलत होते. कर्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मढी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बबनतात्या मरकड होते. या वेळी इतिहासतज्ञ डॉ. किसनराव अंबाडे, विश्वस्त, डॉ. विलास मढीकर, भाऊसाहेब मरकड, नवनाथ मरकड, उपसरपंच रवींद्र आरोळे, बी.जे. मरकड, दादापाटील राजळे शिक्षण संस्थेचे विश्वस्त सुभाषराव ताठे, शेषराव ढाकणे, काशिनाथ बर्डे, बाळासाहेब गोल्हार, प्राचार्य डॉ. राजधर टेमकर, प्रा. आसाराम देसाई, प्रा. शेख अस्लम, प्रा. योगिता इंगळे व डॉ. नितीन भिसे उपस्थित होते. या वेळी राजमाता जिजाबाई, स्वामी विवेकानंद, स्व. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांची जयंती व स्व. अण्णासाहेब शिंदे यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. सूत्रसंचालन वैष्णवी कदम यांनी केले. आभार डॉ. साधना म्हस्के यांनी मानले.

# विद्यार्थ्यांनी व्यसनांपसून दूर रहावे: डॉ. डोंगरे



**कासार पिंपळगाव :** राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात विद्यार्थ्यांवर सामाजिक संस्कार घडतात, हे संस्कार आयुष्य घडविण्यासाठी खूप मोलाचे असतात. यातूनच देशाचे भावी नागरिक घडतात, त्यासाठी विद्यार्थ्यांनी व्यसनांपसून दूर रहावे, असे आवाहन जामखेड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एल. डोंगरे यांनी केले.

पाथर्डी तालुक्यातील कासार पिंपळगाव येथील श्री दादापाटील राजळे शिक्षण संस्थेचे दादापाटील राजळे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष वृध्देश्वर सह. साखर कारखान्याचे उपाध्यक्ष रामकिसन काकडे यांनी, राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातील विद्यार्थ्यांनी केलेल्या श्रमदानाचे कौतुक केले. या वेळी जामखेड महाविद्यालयाचे माजी प्राचार्य अविनाश फलके, कार्यक्रम अधिकारी, वृध्देश्वर सह. साखर कारखान्याचे संचालक श्रीकांत मिसाळ, कानिफनाथ देवस्थान ट्रस्टचे सचिव नवनाथ मरकड, यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. राजधर टेमकर यांनी प्रास्ताविक केले. श्रध्दा कचरे या विद्यार्थिनीने अहवाल वाचन केले. फुलशेटे प्रतिक, खोजे महेश, गरूड तनुजा, या स्वयंसेवकांनी शिबिरातील अनुभव व्यक्त केले. कार्यक्रमास शंकरराव पाखरे, बाबासाहेब किलबिले, नारायण काकडे, सौ. शिदोरे मॅडम, कानिफनाथ देवस्थान ट्रस्टचे सर्व विश्वस्त, मढी ग्रामपंचायतचे सरपंच, सदस्य व ग्रामस्थ त्याचबरोबर दादापाटील राजळे महाविद्यालयातील प्रा.डॉ. एम. एस. तांबोळी, डॉ. जे. एन. नेहूल, डॉ. एस. जे. देशमुख, डॉ. आर. टी. घोलप, डॉ. एस. बी. देशमुख, डॉ. एस. आर. भराटे, डॉ. जी. बी. लवांडे, डॉ. डी. एन. कांडेकर, डॉ. के. जी. गायकवाड, डॉ. अतुलकुमार चौरपगार, प्रा. सी. एन. पानसरे सर्व प्राध्यापक व सेवक उपस्थित होते. शिबिरासाठी मढी देवस्थानचे अध्यक्ष बबनराव मरकड, संजय मरकड, रविंद्र आरोळे, नवनाथ मरकड, कार्यक्रम अधिकारी डॉ. साधना म्हस्के, प्रा. अस्लम शेख, प्रा. योगिता इंगळे, डॉ. नितीन भिसे, शिवाजी बर्डे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन भवार श्वेता व पठाण अयेशा, या विद्यार्थिनींनी केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. आसाराम देसाई यांनी आभार मानले.





























NATIONAL SERVICE SCHEME

प्रा. आसाराम देसाई
डॉ. साधाना म्हस्के
कार्यक्रम आधिकारी

डॉ. आर. जे. टेमकर
प्राचार्य